# काळरात्र संपेल



संपेल रात्र काळी ही घोर लावणारी
येतील लाख किरणे क्षितिजी उठेल लाली

वणव्यात जाळणाऱ्या भय तीव्र या धगीचे
ओला सुगंध येतो बघ मेघ पावसाचे

जाईल ना निराशा! धरुया नकोच शंका
तू हाक नाव वेड्या गाठील तीर नौका

जाईल खास विरूनी दु:स्वप्न पाहिलेले
झटकून टाक असले दुबळे विचार सगळे

**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/